आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.००वाजता

२५ सप्टेंबर २०२४ -मंगळवार

**ठळक बातम्या**

- मेक इन इंडिया उपक्रमाला १० वर्ष पूर्ण, सर्व देशवासियांसह विकसित आणि आत्मनिर्भर भारत बनवण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा निर्धार

- बदलापूर प्रकरणातला मुख्य आरोपी अक्षय शिंदेचा गोळीबारात मृत्यू ही चकमक नसल्याचं मुंबई उच्च न्यायालयाचं निरीक्षण

- जम्मू आणि काश्मीर विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यात २६ मतदारसंघात शांततेत मतदान सुरू

**आणि**

- मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची विजयी सलामी

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया उपक्रमाला आज १० वर्ष पूर्ण झाली. याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांचं कौतुक केलं आहे. देशातल्या १४० कोटी नागरिकांचा एकत्र निर्धार यातून दिसून येतो. यामुळं विविध क्षेत्रातली निर्यात वाढली, उत्पादन क्षमतेचा विकास झाला आणि अर्थव्यवस्था मजबूत झाल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. सुधारणांच्या मार्गावर देशाची प्रगती सुरू राहील आणि एकत्रितरित्या आपण आत्मनिर्भर आणि विकसित भारत बनवू असं त्यांनी सांगितलं.

गुंतवणूक वाढवणं, संशोधनाला चालना देणं, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारणं आणि उत्पादन, आरेखन आणि नवोन्मेष या क्षेत्रात देशाला

आघाडीचं स्थान मिळावं यासाठी सरकारनं हा उपक्रम सुरू केला होता. आता मोबाइल निर्यातीत भारत जगात दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. उत्पादन आधारित सवलत योजनेमुळं विविध क्षेत्रात सव्वा लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आली आहे. गेल्या दशकभरात तासाला एक या वेगानं स्टार्टअप देशात सुरू झाले आणि १५ लाख नागरिकांना रोजगार मिळाला. कोरोना लस उत्पादनातही भारतानं आघाडीच स्थान घेतलं आणि जगातल्या एकूण लशींपैकी निम्म्या भारतानं पुरवल्या.

**<><><><><>**

**म**हाराष्ट्रात वाढवण आणि ग्रेट निकोबार बेटावर गालाथी खाडी इथं नवीन बंदरं विकसित करण्यात येत असल्याचं केंद्रीय बंदरविकास, नौकानयन आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी सांगितलं. नवीन सरकारचा १०० दिवसांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानिमित्त ते वार्ताहरांशी बोलत होते. या बंदरांच्या निर्मितीनंतर देशात मोठ्या बंदरांची संख्या १४ होणार असल्याचं सांगून ते म्हणाले की देशातल्या बंदरांची एकूण माल हाताळणी क्षमता येत्या ५ वर्षात २कोटी TEU पासून ४ कोटी TEU पर्यंत वाढेल.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज दुपारी नाशिकमध्ये भाजपाच्या उत्तर महाराष्ट्रातल्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्र प्रभारी भूपेंद्र यादव, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश यांच्यासह राज्यातले इतर नेते उपस्थित असतील. संध्याकाळी ते पश्चिम महाराष्ट्रातल्या पदाधिकाऱ्यांची

कोल्हापूरात बैठक घेतील. राजकारणा कधी काय होईल, हे सांगता येत नाही. म्हणून २८८ जागांची तयारी केली असली तरी याचा अर्थ युती नको असा होत नसल्याचं भाजपा नेते चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं.

**<><><><><>**

माथाडी कामगारांचा मोबदला स्वतःच्या खिशात टाकणाऱ्यांवर सरकारने कारवाई केली असून यापुढेही अशी कारवाई करण्यात येईल, माथाडींसाठीचा कायदा आणखी मजबूत करण्यात येईल, असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. माथाडी कामगारांचे नेते अण्णासाहेब पाटील यांची जयंती आणि गुणवंत कामगार पुरस्काराचा वितरण समारंभ नवी मुंबईत झाला, त्यावेळी फडणवीस बोलत होते. माथाडी कामगारांना घर मिळण्यासाठी पुढाकार घेऊ, महामंडळाचा नामविस्तार मराठा क्रांतीसूर्य अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ  असा करू असं आश्वासन फडणवीस यांनी यावेळी दिलं. माथाडी कामगारांच्या हिताचे नसलेले प्रस्ताव सरकारने नाकारले असून राहिलेल्या अडचणीही लवकरच सोडवण्यात येतील असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बदलापूर बालअत्याचार प्रकरणातला मुख्य आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यूप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं आज पोलिसांची चांगलीच हजेरी घेतली. अक्षय शिंदेनं पोलिसाकडचं शस्त्र हिसकावून गोळीबार केल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे. त्यावर न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठानं पोलिसांवर प्रश्नांची सरबत्ती केली. गोळीबाराच्या

बाबतीत प्रशिक्षित असलेले पोलिस आरोपीला आवरु शकले नाहीत. यावर कसा विश्वास ठेवायचा याला चकमक म्हणता येणार नाही, ही चकमक नाहीच, असं मत न्यायालयानं व्यक्त केलं. या चकमकीनंतर पोलिसांनी काय पावलं उचलली याची विचारणा न्यायालयानं केली. या घटनेच्या दृश्यांमधे फेरफार टाळण्यासाठी ते सिल केलं आहे का, या घटनेतलं शस्त्र पिस्तुल होतं, की रिव्हॉलवर, असे प्रश्न न्यायालयानं विचारले. या प्रकरणाची निपक्षपाती चौकशी अपेक्षित आहे. तशी ती होत नसल्याचं दिसलं, तर आम्हाला आदेश काढावा लागेल, असं न्यायालयानं बजावलं.

या प्रकरणी पोलिसांविरुद्ध गुन्हा नोंदवला जावा, तसंच या घटनेशी संबंधित सीसीटिव्ही चित्रण सुरक्षित ठेवलं जावं, अशी मागणी अक्षय शिंदेच्या वडलांच्या वकीलांनं आजच्या सुनावणीदरम्यान केली.

<><><><><>

सरन्यायाधीश न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली न्यायवृंदानं मुंबई उच्च न्यायालयातल्या ९ ज्येष्ठ वकिलांच्या नावाची शिफारस न्यायाधीशपदासाठी केली आहे. राजेश दातार, सचिन देशमुख, गौतम अखंड, महेंद्र नेर्लीकर, निवेदिता महेता, प्रफुल्ल खुबाळकर, आश्विन भोबे, रोहित जोशी आणि अद्वेत सेठना यांचा त्यात समावेश आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये कुपवाडा जिल्ह्यात हंदवारा इथं नौगाव सेक्टरमध्ये दहशतवाद्यांसोबत अलीकडेच झालेल्या चकमकीत बुलडाणा जिल्ह्यातल्या पळसखेड नागो या गावचे जवान दीपक बनसोडे यांना वीरमरण आलं. त्यांच्या

पार्थिवावर मूळगावी शासकीय इतमामामध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

जम्मू - काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात आज सहा जिल्ह्यांमधल्या २६ मतदारसंघांसाठी मतदान सुरु आहे. दुपारी १ वाजेपर्यंत सुमारे ३७ टक्के मतदान झालं होतं. या मतदारसंघांतल्या एकूण ३ हजार ५०२ मतदान केंद्रांवर आज सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. या टप्प्यात सुमारे २५ लाख ७८ हजार मतदार २३९ उमेदवारांचं भवितव्य ठरवणार आहेत. मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदारांच्या रांगा लागल्या असून सर्वत्र कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या पुणे दौऱ्यावर आहेत. त्यांच्या हस्ते २२ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध प्रकल्पांचं भूमीपूजन आणि लोकार्पण होणार आहे. या दौऱ्यात ते जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रोला हिरवा झेंडा दाखवतील. तसंच स्वारगेट - कात्रज मेट्रोची पायाभरणी करतील. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते भिडे वाड्यातल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाचं भूमीपूजनही होणार आहे. तसंच ते ३ परम रुद्र संगणकांचं लोकार्पण करतील.

**<><><><><>**

स्वछता अभियान २०२४ अंतर्गत वाशीम जिल्ह्यात विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. जिल्ह्यातल्या मानोरा तालुक्यातल्या भुली इथल्या ग्रामस्वच्छता महिला मंडळाने अयोध्येत श्री रामजन्मभूमी इथे शरयू नदीच्या घाटावर स्वच्छता अभियान राबवलं. स्वच्छता ही सेवा पंधरवड्यानिमित्त आयोजित या उपक्रमात ५१ महिलांनी सहभाग घेतला. तसंच, जिल्ह्यातल्या कामरगाव इथे आज क्लीन इंडिया मानवी साखळी तयार करून स्वच्छतेचा संदेश दिला. हा कार्यक्रम वाशीम जिल्हा परिषदेतर्फे आयोजित करण्यात आला होता. नेहरु युवा केंद्रानं धार्मिक स्थळं आणि महापुरुषांच्या पुतळ्यांची स्वच्छता केली. याविषयी नेहरु युवा बहुद्देशीय मंडळाचे अध्यक्ष प्रदीप पट्टेबहादूर म्हणाले.

**होल्ड - बाइट ....**

**<><><><><>**

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत मराठा आरक्षण आंदोलकांनी आज धुळे शहराजवळ मुंबई - आग्रा महामार्गावर रास्तारोको केलं. आंदोलकांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावं अशी मागणी केली. रास्तारोकोमुळे काही काळ महामार्गावरची वाहतूक ठप्प झाली होती. त्यानंतर पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतलं.

**<><><><><>**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावं या मागणीसाठी हिंगोली जिल्ह्यातल्या डोंगरगाव इथं कयाधू नदीत प्रतिकात्मक जलसमाधी

आंदोलन करण्यात आलं. यावेळी आंदोलकांनी मराठा आरक्षणाची मागणी केली. तहसीलदारांनी निवेदन स्वीकारल्यानंतर आंदोलक पाण्याबाहेर आले.

<><><><><>

मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी विजयी सलामी दिली. पुरुष एकेरीत अग्रमानांकित किदंबी श्रीकांतने इस्त्राएलच्या दुबेवेंको दानिल चा २१-१५, २१-१४ असा  पराभव करुन दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. महिला दुहेरीतही भारताच्या गायत्री गोपीचंद आणि ट्रिसा जॉली यांची जोडी उपउपान्त्यपूर्व फेरीत पोहोचली आहे. पहिल्या फेरीत जपानच्या अकारी सातो आणि माया तागुची या जोडीचा त्यांनी 15-21, 21-16, 21-14 असा पराभव केला.

<><><><><>

ज्येष्ठ चित्रपट निर्माती मधुरा जसराज यांचं आज मुंबईत वार्धक्यानं निधन झालं.  त्या ८६ वर्षांच्या होत्या. प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडीत जसराज यांच्या त्या पत्नी होत्या. चित्रपती व्ही शांताराम त्यांचे वडील होते.

//<><><><><>//